माण देशी बँक

रजि.नं.एस.ए.टी./माण/बी.एन.के./ओ.११९, सन १९९६
दि.३१/१०/९६, एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी.

# माण देशी महिला सहकारी बँक लि., म्हसवड

## ता.माण.जि.सातारा



**मी लस घेतली आहे,लस सुरक्षित आहे!**

" उद्योजिका महिलांच्या आर्थिक सुविधेची
डिजीटल बँकिंग सेवा माण देशी महिला बँकेची "

**ऑडिट वर्ग 'अ'**

## २४ वा
## वार्षिक अहवाल
सन २०२०-२०२१

# संचालक मंडळ (सन २०१६ - १७ ते २०२१-२२)

माण देशी बँक



**श्रीमती चेतना सिन्हा**
अध्यक्षा (म्हसवड)



**सौ.ललीता सा.पोळ**
उपाध्यक्षा (देवापूर)



**सौ.मंजुषा रा.सुर्यवंशी**
संचालिका (म्हसवड)



**सौ.राजश्री नि.दोशी**
संचालिका (म्हसवड)



**सौ.वनिता जा.पिसे**
संचालिका (म्हसवड)



**सौ.राणी वि.बनगर**
संचालिका (म्हसवड)



**श्रीमती रोहिणी ता.बाड**
संचालिका (पर्यंती)



**सौ.सत्यभामा बा.खाडे**
संचालिका (पळशी)



**सौ.रेखा अ.कट्टे**
संचालिका (गोंदवले बु.)



**सौ.रोहिणी प्र.कारंडे**
संचालिका (दहिवडी )



**सौ.अश्विनी वि.पवार**
संचालिका (उंबर्डे )



**सौ.सुवर्णादेवी न.पाटील**
संचालिका (सातारा )



**श्री.विजयकुमार केसकर**
तज्ञ संचालक (गोंदवले बु.।।)



**सौ.दिपाली गवळी**
तज्ञ संचालिका (कोल्हापूर )



**सौ.रेखा कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी




माण देशी फौंडेशन तर्फे सातारा जिल्ह्यातील महिलांना लसीकरण करण्यात आले त्यावेळी सहकार मंत्री मा.ना.श्री.बाळासाहेब पाटील यांनी लसीकरण शिबिरास भेट दिली.




माण देशी फौंडेशन तर्फे सातारा जिल्ह्यातील महिलांना लसीकरण करण्यात आले त्यावेळी मा.श्री.शेखर सिंह जिल्हाधिकारी सातारा यांनी लसीकरण शिबिरास भेट दिली.




दि.२३ सप्टेंबर २०२१ रोजी ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन व दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि यांच्यातर्फे कोरोनाच्या काळातील अविरत सेवेबद्दल मा.श्री.भूषण गोखले,एअर मार्शल (निवृत्त),मा.श्री.अनिल कवडे (IAS) सहकार आयुक्त,महाराष्ट्र राज्य व मा.श्री.मिलिंद काळे अध्यक्ष,कॉसमॉस बँक यांच्या हस्ते माण देशी महिला सहकारी बँकेस '' समर्पन पुरस्कार '' देवून सन्मानित करण्यात आले.




ब्रिक्स (BRICS) बँक म्हणजे ब्राझील,रशिया,भारत,चीन,दक्षिण आफ्रिका
या पाच देशांच्या सभासदांची मिळून एक बँक आहे.
त्यामध्ये आर्थिक विकास कमिटीचे '' अध्यक्षपद '' श्रीमती चेतना सिन्हा यांना मिळाले आहे.

## माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड ता.माण जि.सातारा

रजि.नं.एस.ए.टी./माण/बी.एन.के./ओ.११९, सन १९९६

# चोवीसावी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

माण देशी महिला सह.बँक लि.म्हसवड बँकेच्या सर्व सभासदांना विनंतीपुर्वक कळविणेत येते की, आपल्या बँकेची चोवीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि.२८ सप्टेंबर २०२१ रोजी दुपारी १२ वा.माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवडच्या मुख्य कार्यालय, माण देशी चौक,म्हसवड ४१५५०९ येथे बँकेच्या अध्यक्षा मा.श्रीमती चेतना सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे ऑनलाईन पध्दतीने आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी बँकेने पाठविलेल्या लिंकला क्लिक करून सभेस सहभागी व्हावे, हि नम्र विनंती.

## • सभेपुढील विषय •

१. दि.२७ मार्च २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि.३१ मार्च,२०२१ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक वाचून स्वीकृत करणे.
३. मा.संचालक मंडळाने मंजुर केलेल्या सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०२० - २०२१ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे .
४. सन २०२०-२०२१ चे शासकीय लेखापरिक्षण अहवाल व त्याच्या दोष दुरूस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.
५. दि.३१ मार्च २०२१ अखेरच्या मा.संचालक मंडळाने मंजुर केलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणे.
६. मा.संचालक मंडळाने सन २०२१-२०२२ करिता शिफारस केलेल्या व रिझर्व्ह बँकेने मंजूरी दिलेल्या वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीस व त्यांच्या मेहनतानास मंजुरी देणे.
७. मा.संचालक मंडळाने सन २०२१-२०२२ करिता नियुक्त केलेल्या अंतर्गत लेखापरिक्षक नेमणूकीस व त्यांच्या मेहनतानास मंजुरी देणे.
८. मा.संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंट व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नियुक्तीस मंजुरी देणे.
९. मा.संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
१०. मा.संचालक मंडळाने शिफारस केलेले पोट नियम दुरूस्तीस मंजूरी देणे.
११. वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१२. माण देशी महिला सहकारी बँक व माण देशी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेल्या उपक्रमांची चर्चा करून नोदं घेणे.
१३. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे

स्थळ : म्हसवड
दिनांक : १४ सप्टेंबर २०२१

मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार
RKulkarni
(सौ.रेखा सु. कुलकर्णी)
मुख्य कार्यकारी अधिकारी

### विशेष सुचना -

१. गणपुर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा घेणेत येईल. त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. बँकेच्या ३१/०३/२०२१ अखेरचा २४ वा वार्षिक अहवाल,ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हे बँकेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालय व सर्व शाखांच्या नोटीस बोर्डावर तसेच बँकेच्या वेबसाईट www.manndeshibank.com वर प्रसिध्द करण्यात आला आहे. तरी सभासदांना विनंती की, प्रसिध्द केलेला अहवाल नजीकच्या शाखेत अथवा वेबसाईटवर पहावा.
३. ज्या सभासदांना बँकेच्या कामकाजासंबंधी काही माहिती विचारावयाची असेल तर त्यांनी आपल्या सुचना बँकेच्या ईमेल आयडी info@manndeshibank.com यावर दि.२१ सप्टेंबर,२०२१ पुर्वी बँकेकडे पाठवाव्यात.
४.महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्रमांक २४/१३ स, दि.३०.७.२०२१ नुसार सर्व नागरी सहकारी बँकांची वार्षीक सर्व साधारण सभा व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्याची मार्गदर्शक सुचना देण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी आपले मेल आयडी/मोबाईल नंबर बँकेकडे खालील नमूद कोणत्याही माध्यमातून रजिस्टर करावा. सदर मोबाईल नंबर/मेल आयडीवर वार्षीक सर्वसाधारण सभेस सहभागी होण्यासाठी बँकेकडून लिंक पाठविली जाईल. सभासदांनी सदर लिंकव्दारे सभेमध्ये सहभागी व्हावे.
५. ज्या सभासदांनी आपला ईमेल आयडी,मोबाईल नंबर बँकेकडे कळविलेला नाही त्या सभासदांनी त्याची माहिती बँकेच्या ईमेल आय डी info@manndeshibank.com व ग्राहक सुविधा क्रमांक ९४२३८०७८९४ या एस.एम.एस/व्हाटस्ॲप व्दारे दि.२४ सप्टेंबर,२०२१ पर्यंत पाठविण्यात यावे.
६. या व्हिडिओ कॉन्फरन्स (ऑनलाईन) पध्दतीने होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेची दिनांक,वेळ याबाबतची माहिती एसएमएस/इमेल/व्हाट्सॲप व्दारेही कळविण्यात येईल.
७. आपणास सदर (व्हिडिओ कॉन्फरन्स) ऑनलाईन पध्दतीने होणाऱ्या सभेची नोटीस प्राप्त होताच आपण आपला मोबाईल क्रमांक,ईमेल आयडी रजिस्टर केल्याची खातरजमा करावी,नसल्यास आपण आपली माहिती आपल्या ओळखपत्रासह,सभासद प्रमाणपत्र किंवा सभेची नोटीस सोबत घेवून आपल्या नजीकच्या शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत व सार्वजनिक सुट्टया वगळता दि.२४ सप्टेंबर,२०२१ पर्यंत समक्ष येऊन आपले नाव,मोबाईल नंबर व ईमेल आयडी यासह रजिस्टर करू शकता.
८. बँकेच्या ज्या सभासदांनी यापुर्वी आपले ईमेल आयडी, मोबाईल नंबर रजिस्टर केले असतील त्या सभासदांना त्यावर वार्षिक सभेची लिंक पाठविली जाईल. जर सभासदांनी आपला मेल आयडी, मोबाईल नंबर बदलला असलेस तो मेलव्दारे/एसएमस व्दारे किंवा प्रत्यक्ष नजिकच्या शाखेत जावून अपडेट करावा .
९. वरीलप्रमाणे बँकेकडे रजिस्टर असलेल्या व नव्याने रजिस्टर झालेल्या सर्व सभासदांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर व ईमेल आयडी वर व्हिडिओ कॉन्फरन्सदवारे ऑनलाईन पध्दतीने होणाऱ्या आपल्या बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभेची लिंक दि.२५ सप्टेंबर,२०२१ पासून पुढे सभेपुर्वी पाठविली जाईल.

**सन्माननीय सभासद व भगिनींना माझा नमस्कार.....**

बँकेच्या सर्व संचालक मंडळाच्यावतीने मी आपले मन:पूर्वक स्वागत करते. भारत सरकारव्दारा पुरस्कृत ''डिजीटल इंडिया'' च्या माध्यमातून व काळाच्या गरजेनुसार आपण मोठ्या संख्येने आज डिजिटल मिडिया व्दारे २५ व्या वर्षात पदार्पण करत आहोत. सभासदांच्या व बँकेच्या खातेदारांच्या विश्वासाने व अचूक नात्याने आपल्या बँकेने २५ व्या वर्षात पदार्पण केले आहे त्याबद्दल मी आपले सहर्ष स्वागत व अभिनंदन करते...

कोव्हीड १९ संसर्गजन्य महामारीचा लढा अजून संपलेला नाही. त्यामुळे आपल्याला बँकेची वार्षिक सर्व साधारण सभा व्हिडीओ कॉन्फरन्स व्दारे करणे भाग पडते आहे. यावर्षी आपण परत कोव्हीडच्या दुसऱ्या लाटेला सामोरे गेलेलो आहोत. किती तरी लोकांच्या कुटुंबात कोव्हीड झाला व काही लोकांच्या जिवलगांचा मृत्यू झाला आणि मनात भीती हि बसली कि, कोव्हीडचे काय स्वरूप बघायला मिळते काय माहिती नाही.

दुसऱ्या लाटेमध्ये सुध्दा खूप लोकांना कोव्हीड झाले व काहींना जीव देखील गमवावे लागले. त्या वेळी माण देशी महिला बँकेने एक पाऊल पुढे उचलून आपल्या खातेदारांना रिलीफ वर्क मध्ये जेवणाचे पॅकेट्स दिली. पण माण देशी फौंडेशन ने ठरवले कि, जिथे जिथे कोव्हीड सेंटर आहेत तिथे तिथे पेशंटना पण जेवण दिले पाहिजे म्हणजे कोव्हीड मधून माणसं लवकर बाहेर निघतील, आणि आपण माण-खटाव तालुक्यात पेशंटच्या जेवणाची सोय केली.

तसेच आपण गोंदवलेच्या माणदेशी तर्फे चालवलेल्या हॉस्पिटलमध्ये हजारांच्यावर पेशंट ॲडमिट झाले व बरे हि झाले. कोव्हीड पेशंटला हॉस्पिटलमध्ये नेणेसाठी माण देशी फौंडेशनने मोफत ॲम्ब्युलन्सची सोय केली. त्याचबरोबर एच.आर.सी.टी करण्यासाठी लागणारा खर्च जास्त असल्यामुळे कोव्हीड झालेल्या महिलांचा एच.आर.सी.टी खर्च माण देशी फौंडेशन तर्फे करून कुटुंबावरील आर्थिक भार कमी करण्यास मदत केली.

कोव्हीड काळात लोकांना पैशाची गरज पडली, अशा परिस्थिती मध्ये त्यांना कर्ज हि उचलावे लागले,अशा वेळी माण देशीने पहिले पाऊल उचलले व सोनेतारण कर्जाचा व्याजदर हा इतर बँकापेक्षा कमी करून ८% करण्यात आला. आणि बऱ्याच लोकांना त्याचा फायदा देखील झाला आहे. दुसरे म्हणजे माण देशी बँकेचे एटीम कधीच बंद नव्हते किंवा त्यामध्ये कॅश नव्हती असे झालेच नाही, दवाखान्यात पेशंट असताना केव्हाही रात्री अपरात्री पैशाची गरज पडल्यास एकमेव मार्ग म्हणजे एटीएम हा असतो. हि गरज ओळखून माण देशीच्या सर्व शाखांमध्ये जिथे एटीएम आहे तिथे कायम पैसे उपलब्ध असतील याची सोय करून दिली. त्याच बरोबर एटीएम मध्ये छोट्या नोटांची उपलब्धता करून दिली, कारण आम्हाला अशी तक्रार खूप येत होती कि, उगाच गरीब लोकांना १००-२०० रूपयांसाठी ५०० रूपये मोडावे लागतात व ते लगेच खर्चही होतात. आपल्या बँकेने याचा विचार करून एटीएम मध्ये छोट्या नोटा ठेवण्याची पूर्ण पणे काळजी घेतली.

या कोरोना परिस्थीतीमध्ये लोकांचे धंदे गेले, व्यवसाय बंद पडले. लोकांच्याकडे काहीच आर्थिक उपलब्धता राहिली नाही. पहिले वर्ष कसे तरी लोकांनी काढले. त्यामध्येच मुलांचे शिक्षण देखील मोबाईल वर ऑनलाईन चालू झाले. आणि या ऑनलाइन शिक्षणासाठी स्मार्ट फोनची गरज पडू लागली. तशी परिस्थिती कुटुंबात आली. माण देशीने यावर उपाय म्हणून नवीन कर्जाचे प्रॉडक्ट काढले, बँकेत न येता ताबडतोब ५००० रूपये महिलांना उपलब्ध होतील. सर्व के.वाय.सी. पूर्तता त्यांच्या दारात पूर्ण होईल आणि ताबडतोब त्यांना ५००० रूपये कर्ज मिळेल. कोव्हीडमध्ये त्यांची जी निकड आहे ती त्यांना पूर्ण करता यावी हा त्यामागचा उद्देश आहे तसेच कर्ज हफ्ता परतफेडीसाठी बँकेने डिजीटल बँकिंग व्यवस्था उपलब्ध करून दिली.

माण देशाचा स्वत:चा यु.पी.आय प्लटफॉर्म आहे, माण देशी महिला सहकारी बँक हि जिल्ह्यातील पहिली यु.पी.आय प्लटफॉर्म असलेली पहिली महिला सहकारी बँक आहे.माण देशी फौंडेशनच्या डिजीटल दीदीच्या मार्फत महिलांना डिजिटल प्रशिक्षण दिले जाते, सुरूवातीला १० टक्के महिलासुध्दा डिजीटल बँकिंग करत नव्हत्या. आज जवळजवळ ४०% पेक्षा जास्त महिलांची कर्ज परतफेड हि डिजिटल बँकिंगव्दारे होते. माण तालुक्यातील म्हसवडसारख्या ग्रामीण व दुर्गम भागातील महिला पण डिजिटल बँकिंग करतात ही माण देशीसाठी व समाजासाठी अभिमानाची गोष्ट आहे. लॉकडाऊनच्या काळात लोकं गावात येत नव्हते. पण मुलांचे ऑनलाईन ऍडमिशन, फी भरणे, फॉर्म भरणे यासाठी पण डिजिटल बँकिंग गरजेचे होते आणि हे माण देशी ने बऱ्याच महिलांना डिजिटल प्रशिक्षण दिल्यामुळे सोप्पे झाले. बऱ्याच महिला आपल्या गावातल्या दुसऱ्या महिलांना पण डिजिटल बँकिंग शिकवायला लागल्या जणू काय डिजिटल बँकिंग करणाऱ्यांची एक फौजच झाली आणि त्या गावो-गावी जावून डिजिटल बँकिंग शिकवतात.

हे सगळं करत असताना माण देशीने डिजिटल बँकिंगमध्ये आणखी एक मजल मारली, ती म्हणजे माण देशीचे मोबाईल बँकिंग ॲप आहे. पण त्याच्या बरोबरच डिजिटल बँकिंग मध्ये माण देशीने QR कोडची सोय केली.आपण QR कोड वापरून दुकानदारांना लगेच पेमेंट करू शकतो. QR कोड सुरूवात करण्याची कहाणी तर वेगळीच आहे. लॉकडाऊन मध्ये बरेच ट्रकवाले इथे तिथे प्रवास करायचे. पण व्यवहार करायचा म्हटले, तर कोणी नोटांची देवाण-घेवाण करायचे नाहीत,कारण लोकांना भीती वाटायची कि, आपल्याला कोव्हीड झाला तर? मग त्यावेळी QR कोडची सोय करण्यात आली.त्या QR कोडचा व्यापारी वर्गाला व ग्राहकांना फायदा झाला.

आपण खूप अभिमानाने सांगतो कि, भारत डिजिटल व्हायला पाहिजे भारताचा ग्रामीण भाग डिजिटल झाला पाहिजे. सगळ्यात महत्वाचे म्हणजे आमच्या ज्या दूध विकणाऱ्या महिला आहेत त्या म्हणतात तुम्ही आम्हाला डिजिटल शिकवाल पण आमच्याकडे डिजिटली पैसे तरी आले पाहिजेत. आमच्या खात्यात पैसे असतील तरच आम्ही डिजीटल व्यवहार करू शकतो . त्यासाठी माण देशीने अजून एक मार्ग काढला व सगळ्या महिलांना अकौंटिंग ॲप दिले ज्याच्यामुळे महिलांचा दुधाचा व्यवसाय आहे त्यांनी डिजिटली पैसे पाठवायचे सुरू केले व त्यांच्या खात्यात डिजिटली पैसे आले. असे शेकडो अनुभव माण देशी महिलांचे आहेत की, त्यांनी कसे ग्राहकांकडून मालाचे पैसे डिजिटली घेतले आणि मग डिजिटल पेमेंट केले.

माण देशी बँकेने ''वेअर हाऊस रिसीट फायनान्स '' हे नवीन क्रेडीट प्रोडक्ट चालू केले आहे. माण देशी फौंडेशनच्या वेअर हाऊस मध्ये छोटे व्यापारी व शेतकरी आपला माल रिसीटवर शेतकरी किंवा व्यापाऱ्यांना त्वरित कर्ज दिले जाते. शेतकऱ्यांना कोल्ड स्टोअरेज मध्ये बटाटे,कडधान्ये आणि वेअर हाऊसमध्ये ज्वारी व मका यावर देखील '' रिसीट फायनान्सिंग'' चालू केलेले आहे.

माण देशी बँकेच्या सर्व सभासद, ठेवीदार,खातेदार व कर्जदारांनी आपले जे अनमोल योगदान दिले आहे, अशाच सहकार्याची अपेक्षा बँकेला आपल्याकडून यापुढे देखील आहे.

आपली स्नेहांकित,
**श्रीमती चेतना सिन्हा**
अध्यक्षा

# चालू वर्षातील घडामोडी

माण देशी महिला सहकारी बँकेने २५ वर्षात पदार्पन केले आहे. ग्रामीण भागात सुरू केलेली हि महिलांची बँक आता डिजिटल बँकिंग क्षेत्राकडे वाटचाल केली आहे. सन २०२०-२१ मध्ये माण देशी बँकेने कोरोनामुळे आलेल्या अडचणींना तोंड देवून व्यवहार सुलभ करता यावेत यासाठी अनेक बँकिंग सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या वर्षात आपण युपीआयची सुरूवात केली आहे. आता ग्रामीण भागात सुध्दा डिजिटल बँकिंगचा उपयोग मोठ्याप्रमाणावर होवू लागला आहे. बँकेतर्फे माण देशी सखींची (बीसी) नेमणूक करण्यात आली आहे. या घरो-घरी जावून महिलांना बचतीचे महत्व सांगतात तसेच आर्थीक साक्षरतेचे प्रशिक्षण देतात व त्यांना डिजिटल बँकिंग शिकवले जाते.

## बँकेने ग्राहकांसाठी उपलब्ध केलेल्या सेवा :

**१. कोअर बँकिंग** : बँकेने कोअर बँकिंग प्रणालीचा अवलंब केला असून बँकेच्या सर्व ग्राहकांसाठी एसएमएस बँकींगची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ज्या ग्राहकांनी बँकेकडे आपल्या मोबाईल नंबरची नोदंणी केली आहे अशा सर्व ग्राहकांना त्यांच्या खात्यावरील प्रत्येक व्यवहाराच्या नोंदी एसएमएस व्दारे कळविल्या जातात.

**२.UPI (युनिफाईड पेमेंट इंटरफेस )-** भीम युपीआय,गुगल पे, फोन पे, पेटीएम व्दारे, क्षणार्धात रक्कम वर्ग करणेची सुविधा. (ऑनलाईन खरेदी,बिल भरणा,मोबाईल रिचार्ज इत्यादी)
UPI QR Code व्दारे दुकानदार,पेट्रोल पंप,व्यवसाय,भागीदारी संस्था यांना पैसे स्वीकारण्याची सुविधा.

**३.रूपे डेबीट कार्ड :** बँकेने अत्याधुनिक मायक्रो एटीएम मशीन व रूपे डेबीट कार्ड च्या सहाय्याने आठवडा बाजारात बसून व्यवसाय करणाऱ्या महिलांना त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणीच सर्व आर्थिक व्यवहार करता यावेत याची सोय उपलब्ध करून दिली आहे. बँकेने ईएमव्ही रूपे डेबीट कार्ड व विक्री केंद्र (POS) सेवा सुरू केली आहे. याव्दारे ग्राहकांना शॉपींग मॉल्स,पेट्रोल पंप,हॉटेल्स्,इन्शुरन्स इ.ठिकाणी रूपे कार्ड व्दारे पेमेंट करणे शक्य आहे. बँकेने रूपे कार्ड अंतर्गत ग्राहकांना एटीएमची २४x७ सुविधा उपलब्ध करून दिली असून देशांतर्गत इतर कोणत्याही बँकेच्या एटीएम मधून पैसे काढणे शक्य झाले आहे.

**४.ए.टी.एम.सुविधा :** माण देशी बँकेने शाखा म्हसवड,शाखा सातारा,शाखा धायरी,शाखा कामोठे (नवी मुंबई),दहिवडी, वडूज व गोंदवले बु ।।, अंतर्गत माण देशी बँकेची On Site ए.टी.एम. सुविधा सुरू केली आहे.

**५.मोबाईल बँकिंग लायसेन्स व आय एम पी एस सुविधा :** माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड आता IMPS (Immediate Payment Service) सुविधे सहित, ज्या व्दारे ग्राहक पुढील सुविधांचा लाभ घेऊ शकतात.१) त्वरीत एका खात्यामधून दुसऱ्या खात्यामध्ये पैसे पाठविणे.२) मिनी स्टेटमेंट ३) चेक बुकसाठी मागणी पाठविणे. ४) या सुविधा व्दारे केलेल्या शेवटच्या 5 व्यवहारांची माहिती मिळविणे.

**६.मोबाईल बँक कलेक्शन सिस्टिम अॅप :-** आता माण देशी बँकेमध्ये मोबाईल अॅप्लीकेशनव्दारे टेक्नोस्पायर टेक्नॉलॉजीस् च्या Mobile Bank Collection System (BCS) ची सुविधा सुरू करण्यात आली. आपण हे अॅप अॅण्ड्रॉईड मोबाईलमध्ये घेऊन ते माण देशी बँकेमधून अॅक्टिवेट करून दैनंदिन Collection किंवा वेगवेगळ्या बचत खात्यामध्ये Online अथवा offline या दोन्ही मोडमध्ये काम करू शकता व पैसे जमा करू शकता. तसेच बिझनेस करस्पोडंटस् हे अॅप अगदी सहज हाताळू शकतात. यामध्ये आपण बचत खात्यांमध्ये बँकेच्या अधिकृत एजंट (Business correspondent Agent) व्दारे पैसे भरू शकता.

**७.**BBPS **(भारत बील पेमंट सिस्टिम):-** हि सुविधा नव्याने सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून सर्व प्रकारची बिले भरण्याची सुविधा त्याच बरोबर (Value added services) मोबाईल ॲपव्दारे कोणताही मोबाईल अथवा DTH रिचार्ज करता येतो.

**८.**APBS **(आधार पेमेंट बिल सिस्टिम) :-** या योजनेमुळे शासनाअंतर्गत मिळणाऱ्या सर्व सबसिडी साठी माण देशी महिला बँकेच्या खातेदारांना महिला बँकेचाच खाते नंबर देता येणार आहे. म्हणजेच सर्व सबसिडी महिला बँकेच्या खात्यावर जमा होऊ शकते.

**९.एस एम एस सुविधा :-** पैशाचा व्यवहार झाल्यानंतर बँकेच्या ग्राहकांना त्यांच्या खात्याला नोंद असलेल्या मोबाईल नंबर वरती त्वरीत SMS जातो व छोट्या वायरलेस Thermal printer व्दारे पैसे जमा केलेल्याची पावती देखील भेटते.

**१०.आय.एफ.एस.कोड :-** बँकेच्या आय.एफ.एस.कोड YESB0MAN001 असून तो प्रत्येक चेकवर तसेच पासबुकवर नमूद आहे. या कोडव्दारे बँकेच्या खातेदारास देशांतर्गत कोणत्याही बँकेकडून रक्कम आपल्या बँकेतील खात्यावर थेट जमा करता येईल.

**११.आरटीजीएस व एनईएफटी :-** बँकेने इनवर्ड व आऊटवर्ड आरटीजीएस व एनईएफटीची सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिली आहे. आऊटवर्ड आरटीजीएसने देशांतर्गत कोणत्याही बँकेच्या खात्यात आपल्या बँकेच्या खात्यातील रक्कम ट्रान्सफर करता येईल व इनवर्ड आरटीजीएसच्या माध्यमातून रक्कम स्विकारली जाईल.

**१२.सीटीएस क्लिअरींग सुविधा :-** बँकेने ग्राहकांना सीटीएस क्लिअरींगची सुविधा उपलब्ध करून दिली असून या प्रणाली अंतर्गत देशातील कोणत्याही शहरातील चेकची रक्कम (जर संबंधित बँक सीटीएस क्लिअरींगची मेंबर असलेस ) दुसऱ्या दिवशी सबंधित खातेदाराच्या खात्यात थेट जमा केली जाते.

**१३.पॅन कार्ड :-** बँकेने आपल्या ग्राहकांसाठी नवीन पॅन कार्ड काढणेची सुविधा उपलब्ध करून दिली असून ज्यांना पॅन कार्ड काढावयाचे असेल त्यांनी जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

**१४.वीज बील :-** बँकेच्या शाखेमध्ये वीज बील स्विकारण्याची सोय उपलब्ध आहे.

**१५.ई-स्टेटमेंट:-** ई-स्टेटमेंट सुविधेव्दारे खातेदारांना रजिस्टर असलेल्या ईमेल आय डी वरती महिन्यातून एकदा,तिमाही,अर्धवार्षिक,वार्षिक,दररोज किंवा आठवड्यातून एकदा असे खात्याचे स्टेटमेंट मिळू शकते.

**१६. ई-कॉमर्स सुविधा :-** रूपे डेबिट कार्ड च्या सहाय्याने आता आपण इंटरनेट च्या युगात वेळ व कष्ट वाचवून घर बसल्या कोणत्याही वस्तूची खरेदी करू शकतो. वीज बील,फोन बील अथवा कोणत्याही प्रकारचे बील रांगेमध्ये उभे न रहाता मिनिटासरशी भरू शकतो. डिश टिव्ही,मोबाईल रिचार्ज देखील करू शकतो.

*****

# २४ वा वार्षिक अहवाल सन २०२०-२१

**भागभांडवल :-**

बँकेचे अधिकृत भागभांडवल रू.१० कोटीचे आहे. वर्ष अखेरीस रू.८०४.६८ लाख एवढे जमा झाले आहे. या वर्षात भागभांडवल रू.२७.८६ लाख इतकी वाढ झालेली असून ही वाढ ३.५९% एवढी आहे. वर्षाअखेर एकूण ७१४ नवीन सभासद झाले तसेच मृत्यू राजीनामा इत्यादीमुळे ५४१ सभासद कमी झाले. त्यामुळे वर्षाअखेर एकूण सभासद संख्या ३०८९६ झाली आहे.

**गंगाजळी व निधी :-**

मागील वर्षाअखेर गंगाजळीसह इतर निधी रू.३६२.९८ लाख होती. अहवाल वर्षात त्यात रू.६७.६८ ने वाढ होऊन अहवालवर्ष अखेर गंगाजळी, इमारत निधी, राखीव निधीची रक्कम रू.४३०.६६ लाख इतकी झाली आहे. या वर्षात वाढीचे शेकडा प्रमाण १८.६ ५% इतके आहे.

**ठेवी व विमा संरक्षण :-**

मार्च २०२० च्या ठेवी रू.११००१.६५ लाखावरून मार्च २०२१ अखेर रू.१२१४९.८८ लाख एवढ्या झाल्या आहेत. ही वाढ रू.११४८.२९ इतकी असून, ठेव वाढीचे प्रमाण १०.४४% आहे. या वाढत्या व बदलत्या स्पर्धेत ठेव वाढी बरोबर नफा क्षमता वाढविणे हे ही महत्वाचे आहे त्यामुळे ठेवीच्या व्याजावरील खर्चाचे प्रमाण विचारात घेता ठेवीवरील व्याज दर कमी करावे लागले तरीही आपण एवढ्या ठेवी गोळा केल्या. सभासदांचा ,ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास स्पष्ट आहे. सर्व ठेवी डिपॉझिट इन्श्युरन्स आणि क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन (DICGC) अंतर्गत सुरक्षित आहेत. त्यांची दर सहामाही विम्याच्या हप्त्याची रक्कम डी.आय.सी.जी.सी. (DICGC) कडे बँक भरते.

**कर्जः-**

गतवर्षी येणे कर्ज रू.७२०४.३२ लाख इतके होते या वर्षी त्यामध्ये रू.६५०.८४ लाख एवढ्या रकमेची वाढ झालेली आहे. एकूण कर्ज मार्च २०२१ अखेर ७८५५.१६ लाख एवढे असून कर्ज वाढीचे प्रमाण ९.०३ % आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकाप्रमाणे योग्य तारणी कर्ज वाटपाबद्दल केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे कर्जवाटप करणे आवश्यक असलेने, चालू वर्षात आम्ही कर्ज प्रकारात वाढ करून नवीन कल्पना आपल्यापुढे ठेवणार आहोत, स्थानिक लोकांना कर्ज उपलब्ध करून देण्याची योजना राबविणार आहोत, बँकेचे ठेवीदारांशी, खातेदारांशी, कर्जदारांशी नेहमी सलोख्याचे संबंध असावेत म्हणून त्यात आम्ही नेहमी भर घालतो.

**अग्रक्रम क्षेत्रात कर्ज :-**

भारतीय रिझर्व बँक धोरणाप्रमाणे एकूण कर्जाच्या ४०% कर्ज अग्रक्रम क्षेत्रास असावे. आपल्या बँकेत २०२०-२१ सालात सुध्दा अग्रक्रम क्षेत्रास १०१.७८% कर्जवाटप केलेले आहे. ही आपली अभिमानाची बाब आहे. तसेच दुर्बल घटकांना ९१.९०% कर्जवाटप केले आहे.

**थकबाकी व कर्जवसुली :-**

बँकेच्या आर्थिक उन्नतीमध्ये कर्जवाटप व त्यावरील व्याजाची व हप्त्यांची परिणामकारक वसुलीचा फार मोठा वाटा आहे. त्या दृष्टिने बँकेने सतत पाठपुरवठा केल्यामुळे अहवाल वर्षात थकबाकी चे प्रमाण नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे थकबाकीचे प्रमाण ७.५८% इतके आहे व वसुली ९२.४२% झाली आहे. व NPA चे प्रमाण २.७३ % आहे.

**संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :-**
सदरचा तपशील(महाराष्ट्र सहकार कायदा कलम ७५(२) प्रमाणे) पा.नं.-१९ वर उपलब्ध आहे.

**नफा वाटणी** :- २०२०-२१ या वर्षाच्या नफ्याची वाटणी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे.

| **चालू सालचा नफा** | **८९३१५९९.६५** |
|---|---|
| **तपशील** | **रक्कम** |
| राखीव निधी (२५% प्रमाणे ) | २२३२८९९.९१ |
| इमारत निधी (२५% प्रमाणे ) | २२३२८९९.९१ |
| चढउतार निधी (२५% प्रमाणे ) | २२३२८९९.९२ |
| संशयित बुडीत कर्ज (२५ टक्के) | २२३२८९९.९१ |
| एकूण | ८९३१५९९.६५ |

**शाखा विस्तार :**
बँकेला सातारा,सोलापूर,सांगली,रत्नागिरी,पुणे,कोल्हापूर व रायगड या सात जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्राची मान्यता मिळालेली आहे. भविष्यात बँक या सात जिल्ह्यांत शाखांचे विस्तारीकरण करणार आहे. बँक शाखा विस्तारासाठी RBI ला प्रस्ताव पाठविणार आहे.

**सभासदांची वर्गवारीः-**
महाराष्ट्रातील मागासवर्गीय महिलांना एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देणारी आपली पहिलीच महिला बँक आहे.
१) मागासवर्गीय - २३%   २) ओ.बी.सी.- ०८%   ३) एन्.टी.१२%   ४) ओपन - ५७%

**गुंतवणूक :**
बँकेने दि.३१/०३/२०२१ या वर्षात रू.४४६९.७६ लाख इतकी गुंतवणूक केलेली आहे. सरकारी रोखेमध्ये गुंतवणूक ३७२८.१० लाख व इतर बँकेमध्ये ७४१.६६ लाख अशी गुंतवणूक केलेली आहे.

**अंतर्गत तपासणी :-**
बँकेचे ३१/०३/२०२१ अखेर संपणाऱ्या सहकारी वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षण सी.ए.संगीता अग्रवाल,बी.आर.एम.ए.एस ॲण्ड असोसिएटस् चार्टर्ड अकौटंटस्, पुणे यांनी केले असून त्यांनी बँकेस बहुमोल सूचना व मार्गदर्शन केले आहे.

**प्रशिक्षण कार्यक्रम :-**

दरवर्षीप्रमाणे सन २०२०-२१ मध्ये माण देशी बँकेव्दारे संचालक व कर्मचाऱ्यांना कर्ज,वसुली,गट कर्ज वाटप, कॅशिअर बँकिंग सॉफ्टवेअर संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले. याशिवाय खालील विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले.

| अ. क्र. | प्रशिक्षण विषय | प्रशिक्षणार्थी | प्रशिक्षक |
|---|---|---|---|
| १. | रिझर्व्ह बँक प्रशिक्षण (जमाखर्च वाचणे कर्ज, आर.बी.आय.नियमावली,अंतर्गत लेखापरीक्षण इ.) | मुख्य कार्यालयातील सर्व कर्मचारी व सर्व शाखाप्रमुख | रिझर्व्ह बँक कृषी बँकिग महाविद्यालय पुणे |
| २. | सायबर सुरक्षा प्रशिक्षण | धनंजय भोकरे & अमर चौगुले (आय.टी.विभाग) | सायबरमेंट फॉरेन्सिक्य अँड डेटा सिक्युरिटी सोल्युशन्स प्रा.लि. |
| ३. | कर्मचारी कामगिरी सुधारणा प्रशिक्षण | सर्व कर्मचारी | माणदेशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड |
| ४. | सी.के.वाय.सी.अपलोड प्रशिक्षण | सर्व कर्मचारी | धनंजय भोकरे (आय.टी.विभाग) |
| ५. | नागरी सहकारी बँकेच्या सी.ई.ओ.साठी नियामक,परिचालन आणि व्यवस्थापन समस्येवर कार्यशाळा | सौ.रेखा कुलकर्णी,CEO | कॉलेज ऑफ अॅग्रीकल्चर बँकींग (CAB), आरबीआय,पुणे |

**सन २०२० - २०२१ मध्ये खालील विषयांवर वेबीनार प्रशिक्षण कार्यक्रम करण्यात आले.**

- दि.०९ फेब्रुवारी २०२१ रोजी वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान, पुणे तर्फे आयोजित वेबीनार मध्ये सौ. सुषमा शेंडगे, सीएफओ यांनी '' जेंडर बजेटिंग आणि उपजीविका '' या विषयावर व्याख्यान दिले व माण देशी बँकेचे अनुभव प्रस्तुत केले.
- दि.०९ मार्च २०२१ रोजी नाबार्ड स्टाफ कॉलेज (एनबीएससी) लखनऊ यांच्यातर्फे आयोजित वेबीनार मध्ये श्रीमती चेतना सिन्हा यांनी '' माण देशी महिलांचे सशक्तीकरण व अनुभव '' यावर व्याख्यान दिले.
- दि.१८ मे २०२० रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे मा.श्री.विद्याधर अनास्कर, अध्यक्ष दि महाराष्ट्र फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक्स्, मुंबई यांच्यातर्फे कोरोनाच्या काळात बँकिंग क्षेत्रातील समस्यावर चर्चा मार्गदर्शन करण्यात आली.
- दि.१६ सप्टेंबर २०२१ रोजी कृषि बँकिंग महाविद्यालय, भारतीय रिझर्व्ह बँक पुणे तर्फे '' ताण समजून घेणे आणि व्यवस्थापन करणे '' या विषयावर बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.रेखा कुलकर्णी यांनी प्रशिक्षण घेतले.
- दि.२० ऑक्टोंबर २०२१ रोजी नॅफकब, दिल्ली तर्फे ''सहकारी बँकेच्या संचालकांसाठी मायक्रो फायनान्सवरील वेबिनार ''आयोजित करण्यात आले होते त्यामध्ये प्रमुख वक्ता श्रीमती चेतना सिन्हा व सौ.रेखा कुलकर्णी होत्या.
- वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान, पुणे तर्फे आयोजित वेबीनार मध्ये बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.रेखा कुलकर्णी यांनी खालील विषयांवर व्याख्यान दिले.

  १. दि.१९ जून २०२१ रोजी '' डिजिटल बँकिंग ''

  २. दि.१३ ऑगस्ट २०२१ रोजी दुसऱ्या आयसीए-एमए एफएफ (जपान) ट्रेनिंग कोर्स मध्ये '' माण देशी महिला सहकारी बँक लि.,- महिलांनी महिलांसाठी काढलेली बँक '' या विषयावर यांनी आपले निर्देशानात्मक काम व अनुभव प्रस्तुत केले.
- वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान, पुणे तर्फे आयोजित वेबीनार मध्ये श्रीमती चेतना सिन्हा यांनी खालील विषयावर व्याख्यान दिले.

  १. दि.२० नोव्हेंबर २०२० रोजी '' सामाजिक सहकारी संस्थांच्या माध्यमातून सोशल मिडिया, आर्थिक समावेशन आणि डिजिटलीकरण.''

  २. दि.१८ डिसेंबर २०२० रोजी ''सहकारी संस्थांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण - माण देशी बँकेची केस स्टडी ''

  ३. दि.२४ फेब्रुवारी २०२१ रोजी ''प्रादेशिक स्तरावरील प्रशिक्षण कार्यक्रम - जेंडर बजेटिंग आणि सर्वसमावेशक वाढ ''

  ४. दि.२९ जून २०२१ रोजी ''महिला सक्षमीकरणात माण देशीची भूमिका ''

## बँकेची वैशिष्ट्ये

- ※ व्यापारी बँकापेक्षा ठेवीवर अर्धा टक्का अधिक व्याज
- ※ आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी. व एस.एम.एस.ई स्टेटमेंट बँकींग सेवा उपलब्ध.
- ※ रूपये ५ लाख पर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण
- ※ महिलांसाठी UTI पेन्शन योजना
- ※ आठवडे बाजार करणाऱ्या व जे.एल.जी.कर्जदार महिलांसाठी आर्युविमा संरक्षण.
- ※ महिलांच्या नावावर स्थावर मालमत्ता असल्यास व्याजदरात १% सूट
- ※ नवीन पॅनकार्ड काढण्याची सुविधा
- ※ यु पी आयची सुविधा
- ※ चेक ट्रंकेशन सिस्टिम (सी.टी.एस.)
- ※ ए.टी.एम. मशीन व रूपे डेबीटकार्डच्या साहाय्याने आर्थिक व्यवहार
- ※ वीजबीले स्विकारण्याची सोय
- ※ आठवडे बाजार करणाऱ्या महिलांसाठी जागेवरच कर्जाची उपलब्धता.
- ※ जेष्ठ नागरीकांच्या ठेवीवर ०.५% अधिक व्याज
- ※ व्यक्तीगत जिव्हाळा आणि तत्पर व घरपोच सेवा.

वरील सर्व बँकिग सुविधा देणारी माण देशी ही पहिलीच महिला बँक आहे. या सर्व सुविधा माण देशीच्या म्हसवड,गोंदवले,दहिवडी वडूज,लोणंद, सातारा, धायरी-पुणे, कामोठे-नवी मुंबई या ठिकाणच्या शाखांमधून सर्व ग्राहकांना दिल्या जात आहेत.

## ● ठेवीचे व्याजदर ●

सेव्हिंग्ज ठेव ३%
१५ दिवस ते ४५ दिवस ३.००%
४६ दिवस ते ९० दिवस ३.२५%
९१ दिवस ते १८० दिवस ३.५०%
१८१ दिवस ते ३६५ दिवस ६.००%
३६६ दिवस ते ४५६ दिवस ६.००%
४५७ दिवस ते ५ वर्षापर्यंत ६.००%
दामदिडपट ठेव - ४ वर्षे ९ महिने २६ दिवस
दामदुप्पट ठेव - ८ वर्षे ३ महिने
५ वर्षाच्या पुढे - ६%

※ जेष्ठ नागरिक ०.५ % जादा व्याजदर

## ● बँकेचा शाखा विस्तार ●

शाखा म्हसवड फोन : (०२३७३) २७०११९
शाखा वडूज फोन : (०२१६१) २३२४७०
शाखा सातारा फोन : (०२१६२) २३८५२२
शाखा धायरी,पुणे फोन : (०२०) २४६९०३८८
शाखा गोंदवले बु ।। फोन : (०२१६५) २५८०१४
शाखा दहिवडी फोन : (०२१६५) २२०३८०
शाखा लोणंद फोन : (०२१६९) २२६०९०
शाखा कामोठे फोन : (०२२) २७४३०००१

**● शाखा म्हसवड,वडूज,गोंदवले व कामोठे येथे लॉकर सुविधा उपलब्ध आहे. ●**

## ※ बँकर्स ※

दि.महाराष्ट्र स्टेट को-ऑप बँक लि. मुंबई
सातारा जिल्हा मध्यवर्ती सह.बँक लि.सातारा
बँक ऑफ बडोदा,दहिवडी
बँक ऑफ महाराष्ट्र शाखा-म्हसवड,गोंदवले बु ।।
बँक ऑफ इंडिया शाखा-बुध,दहिवडी
आय.डी.बी.आय.,राणंद,लोणंद,पुणे,कामोठे
एस.बी.आय.वडुज,दहिवडी,ॲक्सीस बँक सातारा
यस बँक,पुणे

**शासकीय लेखापरिक्षक**
किरण दामले ॲण्ड कंपनी
चार्टर्ड अकौटंटस्,चिपळूण

**कायेशीर सल्लागार**
ॲड.भोईटे विलासराव एन.(सातारा)
ॲड.अभिजीत भोसले (कोल्हापूर)
ॲड.सुशील वे पाटील (कोल्हापूर)

**अंतर्गत लेखापरिक्षक**
सी.ए.संगीता अग्रवाल भागीदार
बी.आर.एम.ए.एस.ॲण्ड असोसिएटस्
चार्टर्ड अकौटंटस्,पुणे

# लेखापरीक्षण अहवाल

प्रति,
मा.सभासद
माण देशी महिला सहकारी बँक लि.म्हसवड
ता.माण जि.सातारा

संदर्भ :आपले नियुक्ती पत्र क्र.मुख्य कार्यालय - ३७०(A)/११/२०२० दि.०९.११.२०२०

१. आम्ही माण देशी महिला सहकारी बँक लि.म्हसवड या बँकेच्या सोबत जोडलेल्या दि.३१.०३.२०२१ च्या ताळेबंदाचे व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफा/तोटा पत्रकाचे आणि रोख जमा खर्च पत्रकाचे तसेच सदर आर्थिक पत्रकांचा भाग असणारी महत्वपूर्ण आर्थिक धोरणे व अन्य अनुषंगिक माहिती यांचे लेखापरिक्षण केले आहे. आर्थिक वर्ष ०१.०४.२०२० ते ३१.०३.२०२१ या कालावधीच्या आर्थिक पत्रकांमध्ये आम्ही लेखापरिक्षण केलेल्या ८ शाखा व मुख्य कार्यालय यांच्या आर्थिक व्यवहारांचा समावेश आहे.

**व्यवस्थापनाची आर्थिक पत्रकांबाबतची जबाबदारी**

२.बँकेच्या व्यवस्थापनाची हि जबाबदारी आहे की सदरची आर्थिक पत्रके हि बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९. रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्वे,महाराष्ट्र सहकारी संस्था निबंधक यांची मार्गदर्शक तत्वे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० भारतामध्ये सर्वमान्य असणारी अकौंटिंग तत्वे यांना अनुसरून बनविली जातील ज्यामुळे सदरची आर्थिक पत्रके ही बँकेच्या आर्थिक स्थितीची सत्य व रास्त स्थिती दर्शवितील. सदरच्या जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना आवश्यक असणाऱ्या अंतर्गत नियंत्रणासाठीचे नियम तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे व वेळोवेळी त्यामध्ये सुधारणा करणे आदी बाबींचा समावेश होतो की, ज्यामुळे सदरची आर्थिक पत्रके ही चुका अथवा गैरव्यवहार यामुळे निर्माण होणाऱ्या गंभीर दोषांपासून मुक्त राहतील.

**लेखापरिक्षकांची जबाबदारी**

३.आमची जबाबदारी ही आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे त्या आर्थिक पत्रकांवर मत नोंदविण्याची आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षण हे दि इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकौटंटस ऑफ इंडिया यांनी निर्देशित केलेल्या ऑडिटींग स्टॅन्डर्डस्ना अनुसरून केलेले आहे. या स्टॅन्डर्डनुसार आम्ही नितीतत्त्वांचे अनुपालन करणे तसेच लेखापरिक्षणाचे नियोजन व प्रत्यक्ष कार्यवाही अशा पध्दतीने करणे अपेक्षित आहे की, जेणे करून त्या आर्थिक पत्रकांमध्ये गंभीर स्वरूपाच्या चुका नाहीत, याची रास्त खात्री करून घेतली जाईल.

४.आर्थिक पत्रकांमधील रक्कमांच्या संदर्भातील व इतर माहितीच्या संदर्भातील पुरावे नमुना तत्वांवर तपासण्याचा अंतर्भाव लेखापरिक्षणामध्ये होतो. लेखापरिक्षणाच्या पध्दतीची निवड ही लेखापरिक्षकांचे अनुमान तसेच आर्थिक पत्रकांमध्ये चुका अथवा अफरातफर यामुळे गंभीर दोष निर्माण होण्याच्या शक्यतेची पडताळणी आदी बाबी गृहित धरून केली जाते. अशा जोखमींची पडताळणी करून योग्य अशी लेखापरिक्षण पध्दती निवडताना लेखापरिक्षक प्रामुख्याने बँकेने आर्थिक पत्रके तयार करताना अवलंबलेली अंतर्गत नियंत्रण पध्दती विचारात घेतात. परंतु ही पध्दती बँकेच्या अंतर्गत नियंत्रण प्रणालीच्या प्रभावीपणाबद्दल मत व्यक्त करण्याकरीता निवडली जात नाही. लेखापरिक्षणामध्ये, व्यवस्थापनाने वापरलेल्या अकौंटिंग तत्वांच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे, व्यवस्थापनाने केलेल्या महत्वाच्या आर्थिक अंदाजांच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे व आर्थिक पत्रकांच्या सादरीकरणाचे मूल्यमापन करणे, याचा सुध्दा समावेश होतो.

५.आमचा विश्वास असा आहे की, आमच्या लेखापरिक्षणा दरम्यान आम्हाला मिळालेले पुरावे आम्हाला आमचे लेखापरिक्षणाबाबतचे मत बनविण्यासाठी यथार्थ आधार मिळवून देतात.

अभिमत

६.आमच्या मते आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरून हे हिशोब, त्या सोबतची टिपणे व त्यासोबत जोडलेली परिशिष्ठे आणि आमच्या लेखापरिक्षण अहवालातील मुद्दे यांना अनुसरून बँकींग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ महाराष्ट्र सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा रिझर्व्ह बँकेच्या तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था निबंधक यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात तसेच भारतामध्ये सर्वमान्य असणाऱ्या अकौटींग तत्वांचे अनुपालन करतात आणि

अ.ताळेबंदाच्या बाबतीत दि.३१.०३.२०२१ च्या बँकेच्या आर्थिक परिस्थितीची,

ब.नफा/तोटा पत्रकाच्या बाबतीत या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या मुदतीत बँकेच्या नफ्याची आणि

क.रोख जमा खर्च पत्रकाच्या बाबतीत या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या मुदतीत बँकेच्या रोख रक्कमेच्या प्रवाहाची सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

७.सदर बँकेचे ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकामधील नमुना 'अ' व 'ब' हे अनुक्रमे हे बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ च्या परिशिष्ठ तीन तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या तरतुदींना अनुसरून तयार केले आहेत.

८. परिच्छेद क्र.१ ते ५ मध्ये नमुद केलेल्या लेखापरिक्षण पध्दती आणि मुख्य व शाखा अहवालातील भाग अ,ब आणि क मध्ये नमुद केलेल्या शेऱ्यास अनुसरून तसेच आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे आणि आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरून आणि बँकेने सादर केलेल्या हिशोब व त्यासोबत जोडलेली परिशिष्ठ यांना अनुसरून आम्ही अहवाल करतो की,

१) आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी, आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत व ते समाधानकारक आहेत.

२) आमच्या मते, लेखापरिक्षणा दरम्यान तपासलेली सर्व हिशोब पुस्तके कायद्यानुसार बँकेने ठेवलेली आहेत तसेच लेखापरिक्षणाच्या दृष्टीने शाखांकडून प्राप्त झालेली विवरणे पुरेशी आहेत.

३) आमच्या दृष्टीपतास आलेले बँकेचे व्यवहार हे बँकेच्या अधिकारक्षेत्रास अधिन राहून केलेले आहेत.

४) बँकेचा ताळेबंद तसेच नफा तोटा पत्रक हे बँकेची हिशोब पुस्तके व विवरण पत्रे यांना अनुसरून केलेली आहेत.

५) बँकेने अवलंबलेली अकौटिंग स्टॅन्डर्डस् (अकौटिंग स्टॅन्डर्डस् २२ वगळता ) ही भारतामध्ये सर्वमान्य असणाऱ्या अकौटिंग तत्वांना अनुसरून केलेली आहेत.

९.आम्हाला मिळालेल्या माहिती व स्पष्टीकरण आणि हिशोब पुस्तके व इतर रेकॉर्ड तपासणी करताना महाराष्ट्र सहकारी नियम १९६१ मधील कलम ६९(६) मध्ये नोंदवलेल्या बाबींबाबत दखलघेण्याजोगे व्यवहार आढळून आलेले नाहीत.

१०. तसेच आम्ही अहवाल करतो की,

**आर्थिक वर्ष २०२०-२०२१ करिता संस्थेस वर्ग '' अ '' देण्यात आलेला आहे**

किरण दामले ॲण्ड कंपनी
चार्टर्ड अकौटंटस् करिता






अमित व्ही ओक
भागिदार
मेंबरशीप क्र.१४९०७९
फर्म.रजि.क्र१२४०१५W
UDIN No:- 21149079AAAADS4020

स्थळ : चिपळूण
दिनांक : ०७.०९.२०२१

# माण देशी महिला सह. बँक लि.सातारा म्हसवड ता.माण
## बँकेची प्रगती

| अ. क्र. | तपशील | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ | २०१९ | २०२० | २०२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सभासद संख्या | ११८७१ | १२२२० | १४०५३ | १७१७३ | २२७०१ | २५८३२ | २४९७८ | २६०८५ | २८१५५ | ३०७२३ | ३०८९६ |
| | | | | | | | | | | | | ₹ लाखात |
| १ | भागभांडवल | २६०.०६ | २७६.५३ | ३०८.८१ | ३८४.६७ | ४७०.०० | ५१७.३७ | ५४३.७० | ६०९.३० | ६९०.७९ | ७७६.८२ | ८०४.६८ |
| २ | एकूण ठेव | ३३३८.२५ | ४०००.०० | ४८०१.१९ | ३३९८.०० | ७६३३.२९ | ८७८२.०७ | ८९४२.०० | ९७५२.४१ | १०८४४.४७ | ११००१.६५ | १२१४९.८८ |
| ३ | एकूण कर्जवाटप | २२४०.९९ | २६४१.८३ | २८५३.५९ | ३९५०.३७ | ५३१८.४८ | ५१९९.५२ | ५६८५.९३ | ६४१३.१२ | ६९८२.३२ | ७२०४.३१ | ७८५५.१६ |
| ४ | गुंतवणूक | ८३९.६१ | १२९१.३३ | १७८७.३५ | २२९२.३९ | २२४१.४७ | ३४४०.७३ | ३०१०.९४ | ३४३१.७५ | ४०११.३२ | ३९८१.७७ | ४४६९.७६ |
| ५ | खेळते भांडवल | ३७३३.१५ | ४४९१.३१ | ५३७०.५३ | ७१५१.१४ | ८६३०.८७ | ९८७२.९७ | १०१७०.२१ | ११९४७.९५ | १२४१५.९७ | १२८४७.५५ | १४३२४.०५ |
| ६ | ऑडीट वर्ग | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ |

## परिशिष्ट 'अ'

| | | |
|---|---|---|
| १) बँकेचे नांव | :- | माण देशी महिला सहकारी बँक लि.म्हसवड |
| २) मुख्य कार्यालयाचा पत्ता | :- | मु.पो.म्हसवड ता.माण जि.सातारा पिन नं.४१५५०९ |
| ३) नोंदणी क्रमांक व तारीख | :- | एस.ए.टी.(माण)/बी.एन.के.(ओ)/११९/सन१९९६<br>दि.३१/१०/१९९६ |
| ४) रिझर्व्ह बँक परवाना क्रमांक व तारीख | :- | एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी १३६१ पी, २७/१/१९९७ |
| ५) कार्यक्षेत्र | :- | सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, रायगड, पुणे, कोल्हापूर जिल्हे |

---

### दि.३१/०३/२०२१ रोजीची आर्थिक स्थिती

(रक्कम ₹ लाखात )

| | | |
|---|---|---|
| शाखा - मुख्यालय | | ८ |
| सभासद | १. अ वर्ग | ३०८९६ |
| | २. ब वर्ग | ५१७४ |
| वसुल भागभांडवल | | ८०४.६८ |
| राखीव व इतर निधी | | ₹९८४.५० |
| ठेवी (रू.१२१४९.८८) | अ) बचत ठेव | ₹१९५७.६४ |
| | ब) चालू ठेव | ३५१.८८ |
| | क) मुदत ठेव | ₹९८४०.३६ |
| कर्जे (रू.७८५५.१६) | अ) तारणी | ₹४५२६.१६ |
| | ब) बिनतारणी | ₹३३२९.०० |
| | क) अग्रक्रम क्षेत्र कर्जपुरवठा टक्केवारी | १०१.७६% |
| | ड) दुर्बल घटक कर्जपुरवठा टक्केवारी | ९०.८१% |
| बाहेरील कर्जे | | ₹०.०० |
| गुंतवणूक (रू.४४६९.७६) | सातारा डी.सी.सी.बँक लि. | ₹२२३.८८ |
| | शासकीय मान्यताप्राप्त रोखे | ₹३७२८.१० |
| | इतर | ₹५१७.७३ |
| थकबाकीचे योणे कर्जाशी शेकडा प्रमाण | | ७.५८% |
| ऑडीटवर्ग | | 'अ ' |
| नफा | | ₹८९.३२ |
| एकूण कर्मचारी | | ६८ |
| खेळते भांडवल | | ₹१४३२४.०५ |

## रिझर्व्ह बँक परिपत्रक क्र.५२ दि.२५.०३.२०१४ नुसार बँकांनी ताळेबंद सोबत द्यावी लागणारी माहिती

(रक्कम ₹ लाखात)

| अ. नं. | तपशील | ३१/०३/२० | ३१/०३/२१ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १. | **भांडवल पर्याप्तता (शेकडा प्रमाण)** | १७.८१% | १८.१४% | ०.३३% |
| २. | **भांडवल निधी तपशील** | | | |
| | टायर - १ निधी | १२२२.२१ | १३०२.३३ | ८०.१२ |
| | टायर - २ निधी | ८३.६० | १०५.६५ | २२.०५ |
| | **एकुण निधी** | **१३०५.८१** | **१४०७.९८** | **१०२.१७** |
| | **एकुण जोखीम मालमत्ता** | **७३३१.८३** | **७७५९.८१** | **४२७.९८** |
| ३. | **भांडवल निधीचे जोखीम मालमत्तेशी प्रमाण** | | | |
| | टायर - १ निधी | १६.६७% | १६.७८% | ०.११% |
| | टायर - २ निधी | १.१४% | १.३६% | ०.२२% |
| | **एकुण निधी** | **१७.८१%** | **१८.१४%** | **०.३३%** |
| | **गुंतवणुक व त्यांचे मुल्यांकन** | | | |
| ४. | **अ.एस.एल.आर गुंतवणूक** | | | |
| | १.सरकारी कर्जरोखे | ३१६९.४१ | ३७२८.१० | ५५८.६९ |
| | **एकुण** | **३१६९.४१** | **३७२८.१०** | **५५८.६९** |
| | **ब.बँक व इतर गुंतवणुक** | | | |
| | १.राष्ट्रीयकृत खाजगी व सहकारी बँकांतील ठेवी | ७६६.७० | ५१७.७३ | -२४८.९७ |
| | २. डी.सी.सी.बँक ठेव | ४५.६१ | २२३.८८ | १७८.२७ |
| | **एकुण** | **८१२.३१** | **७४१.६१** | **-७०.७०** |
| | **क.**शेअर्समधील गुंतवणुक (डी.सी.सी बँक,) | ०.०५ | ०.०५ | ००.० |
| | **एकूण (अ+ ब+क)** | **३९८१.७७** | **४४६९.७६** | **४८७.९९** |
| | **ड.मुल्यांकन** | | | |
| | १. दर्शनी किंमत | ३२२५.५० | ३७७५.५० | ५५०.०० |
| | २. पुस्तकी किंमत | ३१६९.४० | ३७२८.१० | ५५८.७० |
| | ३. बाजारभावाने होणारी किंमत | ३२४६.२२ | ३७६१.८६ | ५१५.६४ |

| अ. नं. | तपशील | ३१/०३/२० | ३१/०३/२१ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| | **ई.उत्पादनक्षमता नसलेली गुंतवणुक तपशील** | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५. | **घरकुल,बांधकाम,व्यवसाय यासाठी दिलेल्या कर्जाचा तपशील** | | | |
| | १. बांधकाम व्यवसायिक यांना दिलेले कर्ज | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २.घरकुल व दुरूस्तीअंतर्गत दिलेले कर्ज | १२०७.६३ | १२२६.५६ | १८.९३ |
| | **एकुण** | १२०७.६३ | १२२६.५६ | १८.९३ |
| ६. | **शेअर्स व डिबेंचरर्स तारणावर दिलेली कर्जे** | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७. | **संचालक नातेवाईक यांना दिलेली कर्जे** | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | फंडबेस कर्जाचा तपशील | २०.०८ | ०.०० | -२०.०८ |
| | नॉन फंडबेस कर्जाचा तपशील | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ८. | **ठेवीचा सरासरी व्याजदर** | ७.३८% | ६.६५% | -०.७३% |
| ९. | **एन.पी.ए चा तपशील** | | | |
| | अ. ढोबळ एन.पी.ए शेकडा प्रमाण | ४.७८% | ८.०१% | ३.२३% |
| | ब. निव्वळ एन.पी.ए शेकडा प्रमाण | २.०८% | २.७३% | ०.६५% |
| १०. | **एन.पी.ए मुव्हमेंट** | | | |
| | **आरंभीची एन.पी.ए रक्कम** | २३१.६९ | ३४४.४९ | ११२.८० |
| | **+ चालु वर्षातील एन.पी.ए खाती** | १७०.१२ | ३८८.६८ | २१८.५६ |
| | **- चालु वर्षातील वसुलीची रक्कम** | ५७.३२ | १०४.२ | ४६.८८ |
| | **शिल्लक एन.पी.ए.रक्कम** | **३४४.४९** | **६२८.९७** | **२८४.४८** |
| ११. | **एन.पी.ए.वर्गीकरणानुसार वसुलीचा तपशील** | | | |
| | सब स्टँन्डर्ड | ३४.१० | ६४.८० | ३०.७० |
| | डाऊटफुल एक वर्षापर्यंत | ७.१५ | ३३.९३ | २६.७८ |
| | डाऊटफुल एक ते दोन वर्षापर्यंत | १६.०२ | ४.४५ | -११.५७ |
| | डाऊटफुल तीन वर्षापर्यंत | ०.०५ | १.०२ | ०.९७ |
| | **एकुण एन.पी.ए** | **५७.३२** | **१०४.२०** | **४६.८८** |

| अ. नं. | तपशील | ३१/०३/२० | ३१/०३/२१ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १२. | एन.पी.ए.तरतुदीमधील चढउतार | | | |
| | आरंभीची तरतुद | ११३.७७ | १९८.९३ | ८५.१६ |
| | + चालु वर्षातील तरतुद | ८५.१६ | २२७.५० | १४२.३४ |
| | एकुण तरतुद | १९८.९३ | ४२६.४३ | २२७.५० |
| १३. | स्टँन्डर्ड ॲसेट तरतुदीमधील चढउतार | | | |
| | आरंभीचा तरतुद | २९.६७ | ३०.४२ | ०.७५ |
| | + चालु वर्षातील तरतुद | ०.७५ | १.४५ | ०.७० |
| | एकुण तरतुद | ३०.४२ | ३१.८७ | १.४५ |
| १४ | नॉन परफॉर्मींग गुंतवणुकीपोटी केलेल्या तरतुदीमधील चढउतार | | | |
| | आरंभीची तरतुद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | + चालु वर्षातील तरतुद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकुण तरतुद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १५. | गुंतवणुक चढउतार निधी | | | |
| | आरंभीची तरतुद | ३६.३४ | ४९.०० | १२.६६ |
| | + चालु वर्षातील वाढ व तरतुद | १२.६६ | २०.६० | ७.९४ |
| | एकुण तरतुद | ४९.०० | ६९.६० | २०.६० |
| १६. | गुंतवणुक,घसारा निधीमधील चढउतार | | | |
| | आरंभीची तरतुद | १०.७५ | १०.७५ | ०.०० |
| | + चालु वर्षातील तरतुद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकुण तरतुद | १०.७५ | १०.७५ | ०.०० |
| १७. | खेळत्या भांडवलाशी | | | |
| | १. मिळालेल्या व्याजाचे शेकडा प्रमाण | ११.०३% | १०.४५% | -०.५८% |
| | २. इतर उत्पन्नाचे शेकडा प्रमाण | १.०३% | ०.७७% | -०.२६% |
| | ३. ढोबळ नफ्याचे शेकडा प्रमाण | १.३१% | १.१९% | -०.१२% |

| अ.नं. | तपशील | ३१/०३/२० | ३१/०३/२१ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| | ४. निव्वळ नफ्याचे शेकडा प्रमाण | ०.६४% | ०.६२% | -०.०२% |
| | ५. व्यवस्थापकीय खर्चाचे शेकडा प्रमाण | ५.०४% | ५.८६% | ०.८२% |
| | ६. प्रति सेवक व्यवसाय | २३३.४१ | २९४.१९ | ६०.७८ |
| | ७. प्रति सेवक नफा | १.०६ | १.३१ | ०.२५ |
| १८. | परकीय चलनामधील व्यवहाराची माहिती | लागू नाही | | |
| १९. | रिझर्व्ह बँकेने पेनल्टी आकारली असल्यास त्याचा तपशील | लागू नाही | | |
| २०. | रिस्ट्रक्चर केलेल्या कर्ज खात्यांचा तपशील | घरकुज कर्जे | एस.एम.ई कर्जे | इतर कर्जे |
| | अ.स्टँन्डर्ड रिस्ट्रक्चर केलेली कर्जे | | | |
| | १. खातेसंख्या | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. रक्कम | ०.०० | ०.०० | ०.०० |
